# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.06.2026** **वारःसोमवार**

---

1. विकसित भारतासाठी धाडसी निर्णयांची प्रक्रिया सुरूच राहाणार- रालोआच्या अभिनंदन बैठकीत पंतप्रधानांचं ठाम प्रतिपादन
2. पश्चिम बंगालमध्ये एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची 'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स'ची योजना
3. पॉश कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी आदर्श प्रणाली उभारणारं देशातील पहिलं राज्य बनवण्याचा महाराष्ट्राच्या कामगार मंत्र्यांचा निर्धार
4. वर्ष 2024 आणि 2025 साठीच्या 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची घोषणा आणि
5. जगातील सर्वात मोठी फुटबॉल स्पर्धा, '2026 फिफा विश्वचषक', आजपासून सुरू

**<u>पीएम ठराव</u>**

भारताचे सर्वाधिक काळ नेतृत्व करणारे निवडून येणारे पंतप्रधान होण्याचा मान मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सर्वच स्तरांतून काल अभिनंदनाचा वर्षाव झाला. जागतिक स्तरावरील नेत्यांनीही त्यांचं अभिनंदन केले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी पंतप्रधान मोदी यांचं कौतुक करणारा ठराव काल मंजूर केला. नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं आयोजित रालोआच्या बैठकीत विशेष राजकीय ठराव मांडण्यात आला, त्याला सर्व घटकपक्षांनी अनुमोदन दिले.

या परिषदेला संबोधित करताना, पंतप्रधानांनी देशातल्या 140 कोटी जनतेच्या आशा-आकांक्षाची नक्की पूर्तता होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. 2014मध्ये रालोआ सरकारवर विश्वास ठेवलेल्या जनतेचा आत्मविश्वास आता दुणावला आहे. योग्य उद्दीष्ट ठेवून सरकार चालवलं तर वेगानं विकास घडू शकतो हे पहिल्यांदा घडलं, इतक्या दीर्घकाळ सेवेची संधी मिळणं हे जनतेच्या परिपक्वतेचं लक्षण असल्याचंही मोदी यांनी नमूद केलं.

देशाचा वाढता विकासदर, तिहेरी तलाकविरोधी कायदा, सीएए, भारतीय न्याय संहिता, एक पद एक पेन्शन आदींचा संदर्भ देत देशाच्या प्रगतीसाठी धाडसी निर्णयांची प्रक्रिया अशीच सुरू राहिल असं ठाम प्रतिपादन त्यांनी केलं. एका तपाचा हा प्रवास केवळ आकडेवारीचा नसून देशानं पहिल्यांदाच आपली क्षमता ओळखून अस्थिरतेच्या काळात महत्त्वाकांक्षी उद्दीष्ट साध्य करण्यासाठी अथक प्रयत्न केल्याचं मोदी यांनी नमूद केलं. या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

सुनेत्रा पवार यांच्यासह रालोआची सत्ता असलेल्या सर्व 22 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, तसंच आघाडीतील भागीदार पक्षांचे नेते उपस्थित होते.

**<u>मुख्यमंत्री</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत देशाबरोबरच राज्याच्या विकासालाही नवी दिशा मिळाली आहे, पंतप्रधानांचा हा विक्रमी कालखंड देशाच्या विकासाचा महत्त्वपूर्ण काळ असल्याचे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना काढले. गेल्या बारा वर्षांत राज्याला पंतप्रधानांनी भरीव सहकार्य केलं असून, राज्यातील अनेक महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधांसह विकास प्रकल्पांना केंद्राकडून पाठिंबा मिळाल्याचं फडणवीस म्हणाले.

**<u>मोहोळ</u>**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणेकरांच्या वतीनं पंतप्रधानांना शुभेच्छा दिल्या. मोदी यांनी त्यांच्या विक्रमी कारकीर्दीमध्ये देशवासियांमध्ये विश्वास निर्माण केल्याचं सांगून मोहोळ म्हणाले...

**(कठोरपणे कर्तव्याचे पालन, निर्णय घेण्याची इच्छाशक्ती, दूरगामी विचार करण्याची क्षमता, संकल्पना सिद्धीमध्ये परावर्तीत करण्याचे सामर्थ्य देशातील सामान्य माणसाला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची हातोटी आणि जगासमोर देशाचा सन्मान उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न या मिश्रणातून मोदीजींचे नेतृत्व उजळले आहे. सरकार घोषणा देते आणि त्या प्रत्यक्षात येतात याची अनुभूती सामान्य नागरिक आता घेतो आहे. विकास आणि विरासत या दोन्हींचे महत्त्व समान पद्धतीने रुजवणारा नेता ही मोदीजींची सार्थ ओळख बनली आहे. जनतेच्या हृदयस्थान निर्माण करणाऱ्या मोदीजींना परमेश्वर उदंड आयुष्य आणि ऊर्जा देवो या निमित्तानं पुन्हा एकदा पुणेकरांच्या वतीनं ही शुभेच्छा.)**

**<u>नीती आयोग</u>**

नवी दिल्लीतल्या राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात नीती आयोगाच्या संचालक मंडळाच्या परिषदेच्या 11 व्या बैठकीचं अध्यक्षपद आज पंतप्रधान नरेंद्र मोदी भूषवणार आहेत. 'विकसित भारत @2047 साठी सर्वसमावेशक मानवी विकास' या संकल्पनेवर आधारित ही बैठक होणार आहे. या बैठकीत उद्योजकतेला चालना देणं, कौशल्य विकास वृद्धी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावरही चर्चा केली जाईल.

**<u>बंगाल गुंतवणूक</u>**

'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स' आपल्या सदस्य कंपन्यांच्या माध्यमातून पश्चिम बंगालमध्ये एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना आखत आहे. आयसीसीचे अध्यक्ष ब्रिज भूषण अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ आणि केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्यात नवी दिल्लीत काल झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. पश्चिम बंगालची आर्थिक क्षमता आणि विकासाच्या संधींबाबत उद्योगांचा

वाढता विश्वास यातून दिसून येतो. या बैठकीत राज्याच्या विकास कार्यक्रमाला पाठिंबा देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारसोबत काम करण्याची तयारी आयसीसीनं दर्शविली आहे.

**युद्ध**

युद्ध संपवण्यासाठी वाटाघाटी पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असूनही पश्चिम आशियात तणाव वाढला असतानाच, इराणच्या सततच्या आक्रमकतेला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन लष्करानं काल इराणमधील अनेक लक्ष्यांवर पुन्हा हल्ले केले. वाटाघाटी रखडल्यामुळं इराणला त्याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी दिला; तर धमक्या आणि दबावाखाली आपण वाटाघाटी करणार नाही, असं इराणच्या संयुक्त राष्ट्रांमधील प्रतिनिधींनी स्पष्ट केलं. या संघर्षामुळं जागतिक बाजारात तेलाच्या किमती प्रति पिंप 93 डॉलर्सच्या वर गेल्या आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी सर्व जहाजांसाठी बंद असल्याबाबत इराण आणि अमेरिका यांनी परस्पर विरोधी दावे केले आहेत.

**कॅनडा-सोशल मीडिया**

कॅनडामध्ये समाज माध्यम कंपन्यांनी त्यांची सुविधा सुरक्षित असल्याचं सिद्ध केल्याखेरीज 16 वर्षांखालील मुलांना समाज माध्यमांवर खाती उघडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या कायद्यात हानिकारक सामग्रीच्या सात श्रेणी दिल्या आहेत, त्यामध्ये आत्मघाताला प्रोत्साहन, हिंसा किंवा द्वेष भडकवणारी सामग्री आणि संमतीशिवाय काढलेली खासगी छायाचित्रं यांचा समावेश आहे. वयावर आधारित समाज माध्यमांवर निर्बंध लादणाऱ्या किंवा प्रस्तावित करणाऱ्या ऑस्ट्रेलिया, ब्राझील आणि इंडोनेशियानंतर आता कॅनडाचाही समावेश झाला आहे.

**पॉश कायदा**

'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा, 2013' म्हणजेच पॉश कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश महाराष्ट्राचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. ते काल मुंबईत आयोजित आढावा बैठकीत बोलत होते. या कायद्याची कठोर आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी एक कार्यचौकट तयार करण्यात येणार असून या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी एक आदर्श प्रणाली उभारणारं देशातील पहिलं राज्य बनवण्याचं महाराष्ट्राचं उद्दिष्ट आहे, असं फुंडकर यांनी यावेळी सांगितलं. दहा किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या सर्व आस्थापनांनी पॉश कायद्यानुसार 'अंतर्गत समित्या' स्थापन करणं अनिवार्य आहे.

**संगीत नाटक अकादमी**

सांस्कृतिक मंत्रालयानं वर्ष 2024 आणि 2025 साठीच्या 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची घोषणा केली आहे. अकादमीच्या सर्वसाधारण परिषदेनं संगीत, नृत्य, नाट्य, पारंपरिक, लोककला, आदिवासी कला आणि बाहुलीनाट्य यांसारख्या विविध क्षेत्रांतील 108 कलाकारांची 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारां'साठी निवड केली आहे. तर उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कारां'साठी 106 युवा कलाकारांचीही निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील कथक नृत्यगुरु मनीषा साठे, गायक पंडित अरुण कशाळकर, संगीत रंगभूमीवरील गायक अभिनेते मुकुंद मराठे, गायक आनंद भाटे, अभिनेते अरुण नलावडे, दिग्दर्शक

प्रमोद पवार, भारूडकार भावार्थ देखणे आदींचा समावेश आहे. 'उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कारा'मध्ये 25 हजार रुपये रक्कमेसह ताम्रपत्र प्रदान केलं जातं. 'अकादमी फेलो'ला 3 लाख रुपये रक्कम दिली जाते, तर 'अकादमी पुरस्कारा'मध्ये 1 लाख रुपये रक्कमेसह ताम्रपत्र दिलं जातं. 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप' आणि 'पुरस्कार' राष्ट्रपतींच्या हस्ते एका विशेष समारंभात प्रदान केले जातील.

**<u>पीएलआय</u>**

वस्त्रोद्योगासाठीच्या उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत केंद्र सरकारनं 22 नवीन अर्जदारांना मंजुरी दिली आहे. या तिसऱ्या टप्प्यांतर्गत 96 कंपन्यांची निवड करण्यात आली असून यामध्ये 12 हजार 822 कोटी रुपयांहून अधिक प्रस्तावित गुंतवणूक आणि 58 हजार कोटी रुपयांहून अधिक अपेक्षित उलाढाल यांचा समावेश आहे.

**<u>स्फोट-सातारा</u>**

जम्मू काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातल्या उरी इथं नियंत्रण रेषेजवळ झालेल्या अपघाती स्फोटात महाराष्ट्रातील दोन जवानांचा काल मृत्यू झाला. यापैकी अर्जुन जाधव हे मूळचे सातारा जिल्ह्यातील शहापूर इथले असून विक्रम बाळकृष्ण हे ऐरोली इथले आहेत.

**<u>फुटबॉल</u>**

जगातील सर्वात मोठी फुटबॉल स्पर्धा, '2026 फिफा विश्वचषक', आजपासून सुरू होत असून ती 19 जुलैपर्यंत अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये खेळवली जाईल. यंदा 48 संघ सहभागी होत असल्याने, ही विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात मोठी स्पर्धा ठरली आहे. यजमान असलेल्या तिन्ही देशांनी यात थेट प्रवेश मिळवला आहे, तर उर्वरित 45 संघांनी दोन वर्षांच्या पात्रता फेरीतून आपले स्थान निश्चित केले आहे. या स्पर्धेत प्रत्येकी चार संघांचे 12 गट असतील. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ थेट बाद फेरीत प्रवेश करतील. तसेच, सर्व गटांमधील तिसऱ्या स्थानावर असलेल्या सर्वोत्तम आठ संघांनाही 32 संघांच्या बाद फेरीत प्रवेश मिळेल. स्पर्धेचा अंतिम सामना 19 जुलै रोजी होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.